# सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
# राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (आरोग्य विभाग)

## जाहिरात

महानगरपालिका कार्यक्षेत्रात डेंगी/चिकनगुनियाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. यासाठी डेंग्यु/चिकुनगुनिया यांच्या नियंत्रणासाठी डासोत्पत्ती स्थाने तपासणीस (Breeding Checkers) ५ महिन्यांकरिता मनपा क्षेत्रात निव्वळ हंगामी तत्त्वावर खालील दर्शविलेनुसार नियुक्ती केली जाणार आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | पदाचे नाव | डासोत्पत्ती स्थाने तपासणीस (Breeding Checkers) (फक्त पुरुष उमेदवारासाठी) |
| २. | पदसंख्या | २५ |
| ३. | शैक्षणिक अर्हता | किमान १० वी उत्तीर्ण |
| ४. | वयोमर्यादा | १८ वर्षे पूर्ण ते ४३ वर्षांपर्यंत |
| ५. | वेतन | प्रति दिन रु.४५०/- प्रमाणे किमान २५ दिवसांकरिता दरमहा रु.११२५०/- |
| ६. | कामाचे स्वरूप | दैनंदिन गृहभेटी देऊन कंटेनर तपासणी करून डास अळी शोधणे (Breeding Survey) दररोज किमान २५० घरांची तपासणी करून दूषित भांडी रिकामी करणे, सर्वेक्षण करताना सोबत १% डास अळीनाशक घेऊन वापर करणे व इतर अनुषंगिक कामे. |
| ७. | उमेदवारांसाठी विषय सूचना | सदरची नेमणूक ही निव्वळ हंगामी व तात्पुरत्या स्वरूपात असून, सदर सेवेचा मनपाशी संबंध असणार नाही. तसेच रु.१००/- मात्रच्या स्टॅम्पपेपरवर विहित नमुन्यात करारपत्र करून द्यावे लागेल. तसेच या पदावर काम केलेल्या कर्मचारी आरोग्य सेवा (पु.) या पदावर भरतीसाठी आवश्यक असलेले ९० दिवसांच्या कामकाजाचा अनुभव म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही किंवा उमेदवाराने केलेला कोणताही दावा मान्य केला जाणार नाही. |

### अटी व शर्ती

१. विहित नमुन्यातील अर्ज आरोग्य विभाग मुख्यालय येथे रु.१००/- इतके शुल्क भरून उपलब्ध करून घेणेचे आहेत.

२. उमेदवारांनी लेखी स्वरूपात विहित नमुन्यातील अर्ज वैद्यकीय आरोग्याधिकारी, आरोग्य विभाग मुख्यालय, मेन रोड, स्व.मदनभाऊ पाटील व्यापार संकुल, पहिला मजला, सांगली येथे दि.२४/८/२०२० अखेर सायं.५.३० पर्यंत सादर करून सोबत शुल्क पावतीची छायांकित प्रत जोडणेची आहे.

२. विहित नमुन्यातील अर्जासोबत दोन फोटो व शैक्षणिक अर्हतेची, वयाचा पुरावा, आधारकार्डाची छायांकित साक्षांकित प्रती करून लगत करण्याचे आहेत.

३. सदरची नियुक्ती ही इयत्ता १० वीच्या प्राप्त जादाच्या गुणांक क्रमानुसार देण्यात येईल व समानगुण धारकांपैकी कमी वयाच्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल.

४. नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना मे.कोर्टामध्ये दावा/हक्क सांगता येणार नाही, तसेच त्यांचा मनपा सेवेशी कोणताही संबंध असणार नाही.

५. उक्त भरतीबाबत सर्व अधिकार मनपाने राखून ठेवलेला आहे.

सही/-

**(नितीन कापडणीस)**

**आयुक्त**

सा. मि. कु. मनपा